Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - X Issue - I September - February - 2021-22

Marathi / Hindi

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2019 - 6.601**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

287

Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani



# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | कोवीड-१९ आणि समाजाची भुमिका<br>**प्रा. बिडवे टी. एस.** | ७३-७६ |
| १६ | कोवीड-१९ काळातील जिल्हा प्रशासनाची भुमिका<br>**डॉ. यमलवाड जी. टी.**<br>**इरवतनवाड गोदावरी तुकाराम** | ७७-८२ |
| १७ | कोवीड-१९ आणि प्रसार माध्यमाची भुमिका<br>**प्रा. डॉ. कांबळे एम. एस.** | ८३-८५ |
| १८ | कोवीड-१९ जैविक आपत्तीत जिल्हा प्रशासनाची भूमिका<br>**डॉ. मुक्ता सोमवंशी** | ८६-८९ |
| १९ | कोरोना-१९ काळात उद्योग जगताची भुमिका व भारतीय अर्थव्यवस्था<br>**प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर** | ९०-९५ |
| २० | स्थानिक स्वशासनाची भूमिका<br>**प्रा. डॉ. संजय संदिपान चव्हाण** | ९६-९८ |
| २१ | कोरोना महामारी आणि स्थलांतर<br>**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** | ९९-१०४ |
| २२ | कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. अंभुरे एस. डी.** | १०५-१०८ |
| २३ | कोरोना महामारीचा भारतीय समाज व्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रविण शिवाजी घुगे** | १०९-११२ |
| २४ | कोविड-१९ काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका व विकास : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. डॉ. परशुराम पाटील** | ११३-११४ |
| २५ | कोविड-१९ आपत्ती व्यवस्थापन व पोलीस नागरिक संबंध<br>**प्रो. डॉ. बी. आर. कतुरवार** | ११५-१२१ |




288

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth. Dist. Parbhani

VOLUME - X, ISSUE - I - SEPTEMBER - FEBRUARY - 2021-22
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# १८. कोवीड-१९ जैविक आपत्तीत जिल्हा प्रशासनाची भूमिका

**डॉ. मुक्ता सोमवंशी**
सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक तथा लोकप्रशासन विभागप्रमुख, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.

सारांश

२०१९ च्या उत्तरार्धात Covid-19 या विषाणूचा जन्म चीनमधील वुहान या शहरात झाला. अल्पावधीतच विषाणूचा प्रसार जगातील विविध देशांमध्ये फार जलद गतीने होऊन अनेक लोकांना या रोगाची लागण झाली. तसेच या रोगामुळे मानवाला होणारा त्रास हा भयंकर स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट झाले. अनेक व्यक्ती या रोगामुळे मृत्यू पावल्या. अल्पकाळातच संपूर्ण जगात या रोगाची लागण झाली. ११ मार्च २०२० ला जागतिक आरोग्य संघटनेने या रोगास साथरोग किंवा जागतिक महामारी म्हणून घोषित केले. भारतामध्ये या रोगाची लागण झालेली पहिली व्यक्ती केरळ राज्यात आढळून आली. तर महाराष्ट्रात पुणे या शहरात पहिला रुग्ण सापडला. २२ मार्च २०२० रोजी भारतात जनता कर्फ्यू पाळण्यात आला. आणि २५ मार्च२०२० पासून संपूर्ण भारतात २१ दिवसासाठी लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली. केंद्र व राज्य सरकारने भारतात या रोगाचा प्रसार होऊ नये, यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. केंद्र व राज्य सरकारच्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासकीय यंत्रणेवर असते. त्यानुसार केंद्र व राज्य सरकारच्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हा प्रशासन सज्ज झाले.

संशोधन पद्धती

तथ्य संकलन - माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, मासिक, वृत्तपत्र व इंटरनेटचा समावेश आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश**

१. कोविड १९ विषाणूचा मानवी जीवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.
२. कोविड १९ च्या आपत्तीत जिल्हा प्रशासनाचे योगदान अभ्यासणे.

गृहीत कृत्य - Covid-19 च्या आपत्तीमुळे जिल्हा प्रशासनाच्या कार्यात खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

**प्रस्तावना**

भारतात प्राचीन काळापासून प्रशासनाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून एक विशिष्ट भूभाग निश्चित केला असल्याचे आढळून येते. वेगवेगळ्या राजवटीमध्ये आजच्या 'जिल्हा' या घटकाला वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असे. राजा अकबराच्या काळात या भौगोलिक घटकास 'सरकार' असे संबोधले जात असे. भारतात प्राचीन काळापासूनच महसूल आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने जिल्ह्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व राहिले आहे. आजचा 'जिल्हा' हा जो घटक आहे, त्याची बहुतांश रचना व कार्य ब्रिटिश काळात निश्चित झालेले आहेत. 'केंद्र शासन आणि राज्य शासन यांची



284

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



कार्य करणारी व्यवस्था अपुरी पडते म्हणून या व्यतिरिक्त शासनाची कार्य करण्यासाठी निर्माण करण्यात आलेला प्रभावी प्रशासकीय घटक म्हणजे जिल्हा होय. जिल्हा प्रशासनास जवळपास दीडशेपेक्षा जास्त कामे करावी लागतात. शासनाचे प्रत्यक्षदर्शी कार्य करणारा प्रमुख घटक म्हणून जिल्हा प्रशासन ओळखला जातो'१ जिल्हा प्रशासन शासन व जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. सामान्य जनतेच्या सर्व प्रकारच्या समस्या सोडविण्याचे कार्य जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून होत असते.

"जिल्हा प्रशासन म्हणजे एका विशिष्ट भागातील लोकांच्या कार्याचे व्यवस्थापन होय. अर्थात भारताच्या प्रशासनाचा मूलभूत घटक म्हणजे जिल्हा आणि त्या मूलभूत घटकांमध्ये चालणाऱ्या सर्व सार्वजनिक लोक व्यवहाराचे व्यवस्थापन म्हणजे जिल्हा प्रशासन होय".२ सर्व प्रकारच्या समस्या सोडविणे व जनतेला विकासाच्या दृष्टीने सहकार्य करण्याचे कार्य करावे लागते. जनतेला सर्व प्रकारच्या सेवा जिल्हा प्रशासनामार्फत दिल्या जातात. शासनाच्या सर्व ध्येयधोरणांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारा महत्त्वाचा घटक म्हणून जिल्हा प्रशासनाकडे पाहिले जाते.

'कधी कधी जिल्हा प्रशासनाला नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. अशावेळी हे अनपेक्षित कार्य अनिवार्य कार्य होत असते. नैसर्गिक आपत्ती विविध प्रकारच्या असतात. उदा. अतिवृष्टी यामुळे येणारे महापूर, अवर्षणामुळे निर्माण होणारी पाण्याची समस्या, दुष्काळजन्य परिस्थिती जिल्ह्यात निर्माण होते. तेव्हा अशा चिंताग्रस्त जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्याला संबंधित आपत्तीस तोंड द्यावे लागते'३. तेव्हा जिल्हा प्रशासनाला जी विविध कार्य करावे लागतात, त्यातील एक महत्त्वाचे कार्य म्हणजे आपत्कालीन परिस्थितीत जिल्ह्यातील जनतेचे संरक्षण करणे हे एक आहे. कोणत्याही प्रकारची आपत्ती आली असता जनतेला सर्व प्रकारची मदत जिल्हा प्रशासनाद्वारे केली जाते. पूर,भूकंप, किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात लोकांच्या जीविताचे रक्षण करण्याचे कार्य जिल्हा प्रशासनास करावे लागते. पावसाळा सुरू होताच प्रत्येक जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष सज्ज केला जातो सर्व तहसील कार्यालयांना तसे आदेश दिले जातात.

२०२० या वर्षात जगात सर्वत्र Covid-19 या विषाणूने धुमाकूळ घातला आहे. सुरुवातीस केवळ शहरात आढळून येणारा हा विषाणू आज खेडोपाडी पोहोचला आहे. त्यामुळे भारतातील सर्व जिल्हा प्रशासन कार्यालयांना या आपत्तीचा सामना करण्यासाठी विविध उपाय योजना करणे अगत्याचे झाले आहे. प्रत्येक जिल्हा प्रशासनास आपल्या स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन Covid-19 वर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. जिल्हा प्रशासनाद्वारे हे कार्य अतिशय सक्षम पणे पार पाडण्याचा प्रयत्न केला. covid-19 मुळे देशातील प्रत्येक जिल्हा प्रशासनाच्या कार्यामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली. कारण या विषयांचा प्रसार फार झपाट्याने होतो. त्याचा प्रसार होऊ नये यासाठी प्रयत्न करीत असतानाच, साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ लागू करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजनबद्ध कार्यक्रम तयार करून जिल्ह्या अंतर्गत विविध उपाययोजना करून कोरोना या साथरोगावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. केंद्र व राज्य सरकारकडून येणाऱ्या सर्व सूचनांचे पालन व निर्णयांची अंमलबजावणी जिल्हा प्रशासनाने केली. प्रत्येक जिल्हा प्रशासने



2891

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani



या रोगाच्या काळात आपली भूमिका प्रभावीपणे पार पडल्यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतातील covid-19 मुळे होणाऱ्या मृत्यूचा दर फार कमी ठेवण्यात यश आले.

सामान्य जनतेच्या जीवनाचे संरक्षण करीत असताना अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी सरकारने जी मदत केली, ती प्रत्येक गरजू व्यक्ती पर्यंत पोहचवण्याची जवाबदारी जिल्हा प्रशासनाने पार पाडली. पहिल्या लाटेच्या वेळी हा रोग पसरू नये, यासाठी मोठ्या शहरातून आलेल्या लोकांना कोरंटाईन करून त्यांची व्यवस्था जिल्हा प्रशासने स्थानिक स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या मदतीने केली. यासाठी शाळा व महाविद्यालयांची जागा प्रशासनाने ताब्यात घेतली. या सर्व लोकांना १४ दिवस कोरंटाईन करण्यात आले. तसेच प्रत्येक  पर जिल्ह्यातील लोकांना प्रवेश बंदी करण्यात आली. एका जिल्ह्यातील व्यक्तीला दुसऱ्या जिल्ह्यात सहजासहजी जाता येणार नाही. यावर नियंत्रण ठेवले. यामुळे कोरोनाच्या प्रसारास बहुतांश प्रमाणात कमी करण्यात यश आले.

पोलीस प्रशासन व शिक्षण क्षेत्रातील सर्व कर्मचाऱ्यांना या कार्यात सहभागी करून घेऊन या रोगावर नियंत्रण मिळविता आलेले. बहुतांश नागरिकांना जिल्हा प्रशासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमामुळे त्रास झाला परंतु परिस्थिती गंभीर असल्यामुळे प्रशासनास हे करणे अनिवार्य होते. ग्रामीण भागात covid-19 अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी आशाताई यांना जवाबदारी देण्यात आली. जिल्हा आरोग्य प्रशासनाने आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडली.

भारतात दुसरी लाट पुन्हा मार्च २०२१मध्ये आली. यावेळी मात्र या रोगाची लागण होण्याचे प्रमाण वाढले. तेव्हा जिल्हा प्रशासनाने कोविड सेंटरची उभारणी मोठ्याप्रमाणात करण्यावर भर दिला. कारण अनेक व्यक्ती , त्यांना उपचार वेळेत न मिळाल्यामुळे दगावल्या. औषधी व ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण झाला. अशा प्रसंगी अनेक ठिकाणी अक्षिजन प्रकल्पाची निर्मिती करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रोत्साहन दिले.

उपचारासाठी आवश्यक असलेल्या औषधांवर नियंत्रण ठेवून ते जिल्हा प्रशासनामार्फत पुरविण्याचे कार्य ही करावे लागले. तसेच खाजगी दवाखान्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य सुद्धा जिल्हा प्रशासनास करावे लागले. कारण जनतेची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले. अशा सर्व प्रकारच्या गोष्टींवर जिल्हा प्रशासनास नियंत्रण ठेवणे गरजेचे झाले. परिणामी जिल्हा प्रशासनाच्या कार्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली. जिल्हा आरोग्य यंत्रणेवर ही मोठ्या प्रमाणात भार वाढला आर टी पी सी आर, रॅपिड टेस्ट करून कोविड रोगाची लागण तसेच मृत्यू दर कमी ठेवण्याचे कार्य आरोग्य प्रशासनाने सक्षमपणे पार पाडले.

'देशातील वाढता कोरोना प्रादुर्भाव पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २० मे २०२१ रोजी महाराष्ट्रासह दहा राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून चर्चा केली. या चर्चेमध्ये पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांशी अधिक चर्चा केली. या चर्चे दरम्यान जिल्हाधिकारी डॉक्टर भोसले यांनी अहमदनगर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या उपाय योजना, केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्णयांची यशस्वी अंमलबजावणी, माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेची अंमलबजावणी यांची माहिती पंतप्रधानांना दिली. तसेच रुग्ण संख्या आटोक्यात ठेवण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न, जिल्हा प्रशासनासह पोलीस, आरोग्य, महानगरपालिका आणि जिल्हा परिषद



२५०

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



तसेच इतर सर्व यंत्रणांच्या सहकार्य आणि समन्वयाने राबविण्यात येत असलेल्या उपाययोजना जिल्ह्यातील कोरोनाच्या पहिल्या लाटेत केलेले प्रयत्न आणि दुसरी लाट थोपविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली'४.

यावरून Covid-19 च्या आपत्तीमध्ये जिल्हा प्रशासनाची भूमिका व कार्य किती महत्त्वाचे ठरले हे स्पष्ट होते. Covid-19 ला अधिक आटोक्यात आणण्यासाठी लसीकरण करणे महत्त्वाचे आहे. म्हणून जिल्हा प्रशासनामार्फत लसीकरण मोहिमेला अधिक वेगवान वनविण्यात आले . जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रावर तेथील लोकसंख्येच्या प्रमाणात लस उपलब्ध करून देण्याचे कार्य जिल्हा प्रशासनामार्फत केले जात आहे. तसेच लसीकरणाचे महत्त्व जनतेला पटवून देण्याचे काम सुद्धा जिल्हा प्रशासनाकडून गावोगावी आशाताईंच्या माध्यमातून केले आहे.

उपरोक्त विश्लेषणाद्वारे शोधनिबंधात साठी निश्चित करण्यात आलेले गृहीत कृत्य 'Covid-19 विषाणूजन्य आपत्तीमुळे जिल्हा प्रशासनाच्या कार्यात खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली' हे सत्य असल्याचे सिद्ध होते.

## निष्कर्ष व समारोप

जिल्हा प्रशासन हा भारतीय प्रशासन व्यवस्थेतील अत्यंत महत्वाचा घटक असून कार्याची पूर्तता या घटकांमार्फत अत्यंत प्रभावीपणे केली जाते Covid-19 या रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रत्येक जिल्हा प्रशासनाने अनेक उपाययोजना करून या साथरोगाचा प्रसार थांबविण्यात यश मिळाले आहे. याचे श्रेय जिल्हा प्रशासनास जाते. कारण महाराष्ट्र सरकारने प्रत्येक जिल्हा प्रशासनास तेथील परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले. कारण प्रत्येक जिल्ह्याची परिस्थिती ही वेगवेगळी आहे. तेंव्हा तेथील परिस्थितीनुसार कार्य करणे अधिक सोपे जाईल. तेव्हा सर्वांसाठी एकच निर्णय लागू करणे योग्य नाही, याची जाणीव असल्यामुळे राज्य सरकारची ही भूमिका महत्त्वाची ठरली. राज्य शासनाच्या या भूमिकेमुळे जिल्हा प्रशासनाला आपल्या क्षेत्रातील एकंदरीत व्यवस्थापन करणे शक्य झाले. थोडक्यात Covid-19 या साथरोगामध्ये जिल्हा प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

## संदर्भसूची

१. प्रा. के.आर. वंग जिल्हा प्रशासन , विद्या वुक पब्लिशर्स, औरंगाबाद पृष्ठ.क्र.७.
२. उपरोक्त पृष्ठ क्रमांक ८
३. प्रा डॉ नंदकुमार नाईक, लोक प्रशासन व व्यवस्थापन, स्टडी सर्कल, मुंबई पृष्ठ क्र.२०६
४. महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्र २० मे २०२१.



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani